# प्रभुतरुण


| वर्ष ४७ | अंक ६ | मुंबई | डिसेंबर २०१३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## मौनराग

—सुहासिनी कीर्तिकर

ती महिनाभर कामाला गेली नाही. खरं तर तिच्या सगळ्या कॅज्युअल्स संपल्या होत्या. सासूबाई घरात पडल्याचं निमित्त होऊन हॉस्पिटलमध्ये पाय वर टांगल्या अवस्थेत. त्यांना रोजचं जेवण पोहोचवायचं. रात्री तेथे सोबतीनं झोपायचं. मोठी सून म्हणून सगळं तिच्यावर. धाकटी परगावी. पैसे पाठविले की झालं काम. दिवसातरी नवऱ्यानं हॉस्पिटलमध्ये सोबत थांबायचं ना! निदान घरात तिच्या हाताशी वावरायचं! पण, नाही. त्याच्या अनेक गोष्टी महत्त्वाच्या. काय झालं की शेजारच्या गावी स्फोट होऊन घरं कोसळली. त्यांना अन्न, निवारा हवा. त्यासाठी हा पुढे. अनेकजणं जखमी झाली होती. आपल्या वाहनाने हा त्यांना घेऊन धावला. ॲम्ब्युलन्स, डॉक्टर्स, उपचारांची यातायात... या सगळ्यात हा कार्यकर्ता म्हणून तिथे मदतीला आहेच. त्या घातपाती अपघाताची हाक मोठी होती हे खरेच. त्याच्या समाजकार्याचा बोलबाला झाला. पेपरमध्ये फोटो आले. नेमक्या अशावेळीच आई पडली. तर त्याला तिच्याकडे पहायला वेळच नाही. मग ही आपली 'मम' म्हणत आईंकडे लक्ष द्यायला धावाधाव करत्येय. कामावर सरळ रजा टाकून. पुढं पुढं तर अर्धपगारी... बिनपगारी. यामुळं आई सूनबाईंवर खूष का? तर; नाही. ''सकाळी नाष्टा घेऊन किती उशीरा येते. रात्री सोबतीला येते पण माझ्याशी गप्पा मारेल तर शपथ. ती अन् तिचं पुस्तक. ती वाचत असली की माझा मेलीचा डोळा लागत नाही.''... सासूबाईंचे हे असं बडबडणं चालू. बरं, अजून तरी हिला मूलबाळ नाही. 'लग्नाला चांगली तीन वरसं झालीत.' तिच्या अनेकदा मनात येतं की बोलावं सासूबाईंशी. माराव्यात चार शिळोप्याच्या गप्पा. पण विषय कुठलाही असला तरी ही 'वांझ तीन वरसं' येऊन टपकायचीच. तिला वाटायचं, 'तीन म्हंजे फार का? नवऱ्यानंच तर केलंय प्लॅनिंग. सांगावं का आईंना? पण नको. तिला तो विषयच नको होता. मग काय? तो समाजसेवेत दंग; अन् ही आपल्या संसारसेवेत दंग. तिची घुसमट कुणाला कळणार? खरं तर नोकरीत रजा टाकून असं घरात बसणं ही देखील शिक्षाच. मनाला विरंगुळाच नाही. ते जणु माणसात असूनही एकांतवासाची शिक्षा भोगतेय.

ही नंबर एक म्हणू या. नंबर दोन कशी? नटून थटून वावरणारी. माझ्या शेजारीच रहाते. सक्काळी सक्काळी चालण्याचा पोशाख चढवून, बूट घालून ऐटीत 'वॉक'ला जाते. तिचाही एक नवरा आहे. चालून ती घरी आली की या एकुलत्या नवऱ्याचं चहापाणी त्याच्या अगदी हाताबोटात देते. तो वर्तमानपत्रात बुडून गेलेला असतो. नाश्ता झाला की त्याचं आंघोळ-पाणी हीच बघणार. तो फोनवर असला तरी भोवतीभोवती भिरभिरणार. तो घराबाहेर पडताना त्याला 'बायबाय' करायला म्हणून दारात येणार. कुणाला वाटावं, 'किती छाऽऽन जोडी आहे!' पण दोघात अजिबात संवाद नाही. तिला एक मुलगा आहे, पण स्वत:मध्ये खूष असा तो कुठे बाहेरच्या शहरी वसला आहे. दर आठवड्याला एकदा फोन करतो. 'मम्मा, हाऊ आर यू?'; 'काय मग? या आठवड्यात काय प्रोग्रॅम काय तुझा?'- विचारतो बापडा. पण तिला अन् त्यालाही माहीत असतं की फोन 'कट' झाला की ही संवादाची 'रूटीन' कटकट संपली. तो त्याच्यात आणि ही हिच्यात. दिवसभर मग ही छाऽऽन टी.व्ही. बघते. पूर्वीच्या बायका वेळ जायला वाती वळत. ही वीज जाळते. प्रकाशचित्र डोळ्यांसमोरून सरकत जाते. मन बधीर होतं. वेळ

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## I Was Alive When Sachin Played Cricket!!

**-Mayura Nayak**

Before I even begin, let me confess that I don't qualify to write even a single statement about him. I am neither a cricket nor a Sachin fanatic. But the recent surge of emotions that I along with the rest of the world witnessed is compelling enough for me to write a few words about this Bharat Ratna awardee!!

Recently the social media expressed conflicting views on whether Sachin was a true worthy recipient of the most prestigious award bestowed upon any Indian for his contribution and great work in serving this nation. "Kapil Dev's World Cup winning team in 1983, taught us to dream, but Sachin enticed us to dream big and achieve big through dedication and commitment, he was the catalyst in making people sit up and notice India as a world force, at a time when the 'India' story was just beginning and hence he is the worthy recipient of the Bharat Ratna". A lot of us will wholeheartedly agree to this statement quoted by Raj Mankar my cousin and a cricket enthusiast and an ardent Sachin fan. But there were some other almost contradicting views in media. They said – "Fine Sachin was a talented cricketer, he has many an unbeatable records to his name, but for all this he got name, fame and money…. Tons of money! What did he do for India to deserve this honour devaluing the prestige attached to this award?" (Quotes picked up from social media). "If it is for sports, then, why not Dhyanchand, the hockey wizard, Milkha Singh, athlete, PT Usha and so on?". Well, this debate may go on, but a unanimous verdict is sure in favour of this honour bestowed upon the Little Master.

Cricket to me is just a game that is played in our by lanes and gullies, a sport that bonds two eleven member teams that we see in countless parks, maidans, and stadia. International cricket to me is an extension of the teams to the countries. The popularity of this sport in India has converted its sports value to one of the highest entertainment quotient that any sport could boast of and that media can ever have monetized on. If Bollywood is a source of entertainment, in a cricket crazy country like India, cricket probably enthrals our people much more than Bollywood. In that comparison if the country has been OK with legendary singer Lata Mangeshkar being awarded the Bharat Ratna who has given Bollywood some of the most melodious songs and who has been the voice of the Indian Heroine for the longest span in the history of Indian Cinema, then Sachin Tendulkar surely is a legend in his field of sports and entertainment keeping his audience in awe and forever inspired by his sheer talent, humble values and the dignity in which he has conducted himself throughout his career. Simply translating Bharat Ratna in English would mean India's Jewel, which he surely seems to be!

I may have partially observed him very frivolously passing by the TV set when cricket crazy fans in my home sat watching him play. And the one common attribute that he always reflected was his modesty whether we won or lost because of him or in spite of him; he always came across as the most humble player on the grounds. I may not have any clue of his achievements in statistics, but the outpour of emotions during his 200th test match which announced his retirement sure symbolizes the love, respect and affection this country has for him. It clearly brings out the passion, determination and the love he has for the game that he has consistently and rightfully maintained in a long span of 24 years, probably the longest sports career span we may have witnessed. To have the nation and the world stand still and watch him swirl his bat, to sustain the

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम ४ वरून)

सुन्नपणे सरकतो. संध्याकाळ उगवते. मग ही परत सजूनधजून बाहेर पडते. सोसायटीच्या कट्ट्यावर बसते. मात्र कुणातही न मिसळता-अलिप्तपणे समोर चाललेला मुलांचा खेळ बघत. सोसायटीतल्या सगळ्याच बायकांचं कधी नव्हे ते एकमत आहे- 'शिष्टच आहे बया. देखणेपणाचा केव्हढा तोरा बघा.', 'हूं. काय तरी एक एक तऱ्हा. सदा आपलं नवऱ्याभोवती भोवती करायचं. आम्हाला नाहीत का नवरे?' पण त्या बिचाऱ्यांना काय माहीत की नवरा नावाचा एक अदृश्य सीसी कॅमेरा तिच्यावर रोखलेला असतो म्हणून. सतत. सदासर्वदा. तिनं दारी आलेल्या भाजीवाल्याशीही साधं बोलायचं नाही. शेजारच्या काकूंना घरात घ्यायचं नाही. मुलाशी संवाद टाळताच येत नाही म्हणून आठवड्यातून फक्त पाच मिनिटे. ती बायको जशी काही त्याची प्रॉपर्टी. केवळ भिंतीत चिणता येत नाही तिला, बाहेरून टाळं लावून जाता येत नाही, तिला लॉकरमध्ये ठेवायची सोय नाही म्हणून ती सजूनधजून घर नावाच्या वास्तूत बंदीवान. अबोलपणे वावरणारी जिवंत कळसूत्री सुंदर बाहुली!

अशा एक, दोन, तीन... कितीतरीजणी. 'मौनराग' आळवणाऱ्या. हा 'मौनराग' आपल्यासारख्या सुजाण माणसांना नीट ऐकू यायला हवाय. राजन गवस यांच्या 'ब बळीचा' या कादंबरीत एक गोष्ट आलीय. गोष्ट अशी- एक राजा ऋषीकडे जातो. म्हणतो, 'मला बाई समजून घ्यायचीय.' ऋषी सांगतो, 'तुझ्या डोळ्यातलं बाईचं शरीर, तिच्यासाठीच्या वासना पुसून टाक.' राजा चकीत होऊन म्हणतो, 'वासना पुसून टाकली तर मग बाईत उरलं काय?' ऋषी उत्तरतो, 'माणूस!' बाईतलं हे माणूसपण केवळ नवऱ्यालाच नव्हे; तर आपल्या सगळ्यांनाच समजून घ्यायला हवं की नाही?

सध्या जे 'तहलका' तरुण प्रकर्ण चाललंय, आसारामबापूंचे जे 'आध्यात्मिक' चमत्कार गाजताहेत, भर दिवसा गजबजत्या वस्तीत माणसाच्या दुनियेत जी अमानुषता पिसाटली आहे; त्या सगळ्या सगळ्याला आळा घालायचा; तर हे 'माणूस'पण जपायला हवेय्.

मित्रहो, २०१३च्या या वर्षसरत्या महिन्यात अमानुषतेला सरणावर चढवून २०१४चे माणूसपणाने आपण सर्वांनीच स्वागत करायला सिद्ध होऊ या. होऊ या ना?

(पान १ कॉलम ४ वरून)

performance for that long a career with feet firmly held on ground is an achievement in itself. "Speaks volumes of his middle class maharashtrian value system" says Raj Mankar.

It was indeed an amazing experience for me to see all my cricket crazy family and friends turning into these super poets and writers overwhelmed with this cricket phenomenon! My nephew, Nishad Vijayakar who probably posts only when he has something to say on cricket in his status on his facebook profile has this to say for him – "Only Sachin Tendulkar can make you feel happy, proud, sad and disappointed at the same time. Unfortunately though after tomorrow, we will no longer be able to watch the God in his temple (any stadium) with his weapon (bat). I am one of the lucky few who actually got to watch the God's last innings live!! We will miss you Sachin Ramesh Tendulkar. You have made the whole nation proud and happy. Couldn't have asked more from you — feeling blessed."

Raj Mankar – "End of an era! Not only his cricket, but even his farewell speech was exemplary. It speaks volumes of the entire persona!".... I remember a picture that The Times Of India published the very next day of his speech, where we could see Sachin referring to points he had jotted down for his speech. The points were nothing but people whom he wished to thank. And the fact that he did not have a well scripted speech shows that whatever he spoke was from his heart.

Akshay Kothare another 'sachinist' and my brother in law – "Cricket will be now known as AS (After Sachin) and BS (Before Sachin)" Very emotionally he admitted that he along with the rest of the fellow fans in Wankhede had moist eyes when Sachin took his last leap!

Another friend very emotionally declared that Sachin was the reason to bunk college, or work and fight it out for passes to get into a stadium and watch the God of cricket play, and that never in the future will he enter a stadium to scream crazy slogans for any other cricketer.

Such craze, madness, love, respect, admiration for a legend who has left an indelible mark in the hearts of innumerable fans! He has carved a niche for himself in the history of World Sports. While the nation mourns at the loss of such talent from Team India, I am sure the whole world is waiting to know what the little master chooses to do in his life's second innings! While he may not have influenced my life in any way, but those few days of Sachin's farewell surely shook me to look up and notice this wonder. Very few people can command such worldwide attention even from people like me, who are least interested in the game. His effect on people around me and the country as a whole, surely calls for my salute to this legend and nudges me to proudly declare that "I was alive when Sachin played cricket!"

"Give me some sunshine, give me some rain, give me another chance I want to watch Sachin play cricket again!" – Song recomposed by Nishad Vijayakar!

*

## पाठारे प्रभु चॅरिटीज

दिनांक २४ नोव्हेंबरची सायंकाळ होती यशस्वी विद्यार्थ्यांचे नाव रोशन करणारी. दरवर्षीप्रमाणे 'शारदेच्या दरबारातील विद्याभूषण मानकरी यांचा सत्कार' समारंभ भव्यदिव्य स्वरूपात पार पडला. या भव्यतेत यावर्षी भर पडली ती या समारंभाचे दरवर्षीचे ठिकाण बदलल्यामुळे. वांद्रे येथील उत्तर भारतीय संघ सभागृहात हा सोहळा अधिक मोठ्या मंचावर साजरा झाला. पंचावन्न विद्यार्थी यंदा मानकरी होते. विद्यार्थ्यांची तुतारीच्या ललकारीत मिरवणूक, लक्षणीय परभू व्यक्तिमत्वाची आठवण ठेवून प्रमुख पाहुण्याहस्ते त्या व्यक्तीच्या तसबिरीला वंदन, दीपप्रज्ज्वलन पार पडल्यावर चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय शंकर मानकर यांनी प्रास्ताविक केले.

समारंभाचे प्रमुख पाहुणे होते श्री. गौतम सुरेश नायक. सुयोग असा होता की कै. सुरेश नायक यांनाच आदराने यावर्षी भावांजली वाहिली गेली. श्री. वीरपाल राणे यांनी सुरेश नायकांचे योगदान आपल्या प्रभावी वक्तृत्वाने अधोरेखीत केले. सौ. सुमन गौतम नायक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव केला गेला. श्री. गौतम नायकांनीही चॅरिटीजच्या चोख हिशोबाबद्दल आणि ते सादर करण्याच्या शिस्तशीर तत्परतेबद्दल गौरवोद्‌गार काढले आणि विद्यार्थ्यांना आपल्या भाषणातून मार्गदर्शन केले. सौ. मेघा वाझकर आणि सौ. अनारकली वेलकर यांचे सूत्रसंचालन, श्री. राजन जयकर यांचे आभार प्रदर्शन, देणग्यांचे श्री. संदीप वेलकर यांनी केलेले वाचन, यशस्वी विद्यार्थ्यांचे मनोगत (तीन, चारच विद्यार्थ्यांनी मराठीत मनोगत मांडले!) यांनी कार्यक्रम यशस्वी झालाच; पण रंगतदार झाला तो कवयित्री नलिनी तळपदे यांच्या गीतरचनेने आणि सौ. आसावरी धुरंधर- सौ. रॉनिका विजयकर यांच्या स्वरसाथीने. शेवटी श्री. अजित विजयकरांची प्रस्तावना असलेल्या 'आता भैरवी' या संगीत कार्यक्रमाने तर भैरवीचे सूर दरवळत ठेवले. पसायदान, राष्ट्रगीत झाल्यावर दरवर्षीप्रमाणे भोजन-आस्वाद दरवळत राहिला; हे वेगळे सांगणे नलगे. हॉल तळमजल्यावर, भोजनव्यवस्था प्रशस्त मैदानात-येणाऱ्या रसिकांना फार सोईचे झाले. चॅरिटीजच्या कार्याला दाद चौदा लाखांवर देणग्यांचा वर्षाव या निमित्ताने करून दिली. चॅरिटीजला शुभेच्छा.

दिनांक २ डिसेंबर रोजी चॅरिटीजच्या नवी वाडी येथील माहेश्वरी देवीच्या उत्सवास सुरुवात झाली. देवीची पालखी व्यंकटेशाच्या देवळातून आनंदाने गाजत वाजत आली. चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय मानकर, श्री. जय नायक आणि अन्य सदस्य, भाविक, आदी या सोहळ्यात सहभागी झाले. देव्यै नमः।

## पाठारे प्रभु सोशल समाज

दिनांक २३ नोव्हेंबर २०१३ रोजी सोशल समाजाचे दिवाळी संमेलन खारच्या सोसायटी हॉलमध्ये दिमाखाने साजरे झाले. प्रमुख पाहुण्या होत्या सौ. उर्वशी आनंद धराधर. समाजाध्यक्षा श्रीमती स्वाती प्रविण राणे यांनी अतिशय छान प्रास्ताविक करून पाहुण्यांना भेट अर्पण केली. सौ. उर्वशी धराधर यांनी यथोचित भाषण करून आपल्या भावना व्यक्त केल्या. सौ. स्वाती तारकनाथ जयकर यांनी आभार मानले; तर या समारंभाचे नेटके सूत्रसंचालन सौ. नीता सेंजित यांचे होते. त्यानंतर दोन तास रंगला 'जय शं-करा विद्याधरा' हा गीतनृत्याचा कार्यक्रम. विद्याधर गोखल्यांच्या नाट्यपदांचे वैशिष्ट्य त्यांची कन्या सौ. शुभदा दादरकर यांनी 'सांगे वडिलांची कीर्ति' पद्धतीने निवेदन करीत सादर केले. सवेश नाट्यपदे आणि कथ्थक नृत्यांसह सादर झालेली गोखल्यांची गीते श्रोत्यांवर गारूड करून गेली. नृत्याचे दिग्दर्शन होते सौ. स्मृती तळपदे यांचे. या कार्यक्रमाला श्री. श्रेयस तळपदे आणि अभिराम भडकमकर यांचीही उपस्थिती लाभली. श्री. शीतल तळपदे यांच्या पुढाकाराने झालेला हा समाजाच्या निवडणुकीनंतरचा पहिला दीपोत्सव दिवाळीच्या आनंदात भर टाकून गेला.

दिनांक १ डिसेंबर रोजी सोशल समाजातर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

## भावांजली

ॲड. सौ. नेत्रा अजित विजयकर यांचे वडील श्री. शंकर गजानन वेलकर यांना नुकतीच देवाज्ञा झाली. ७ डिसेंबर रोजी त्यांचा वाढदिवस असतो! नाबाद अठ्ठ्याण्णव यशस्वी रीतीने ते जगले. गेल्या वर्षी पा. प्र. चॅरिटीझने तत्कालीन अध्यक्ष श्री. अजित मोरोबा विजयकर यांची पंच्याहत्तरी थाटात साजरी केली. त्या समारंभाला ते आवर्जून उपस्थित होते. यावर्षीही चॅरिटीझने कै. गजानन वेलकरांच्या स्मृतीला उजाळा दिला. त्यासाठी ते येणारही होते. त्यांच्या उत्साहाला आणि कार्याला तोड नव्हती. आम्ही सौ. नेत्रा आणि श्री. अजित, शंकर वेलकरांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहोत.

लेखांक-१२

## फुलता नलिनी दल

# सुरक्षेची ऐशी तैशी

— नलिनी तळपदे

'इस देशकी धरती सोना उगले, उगले हिरे मोती, इस देश की धरती...' आमच्या देशातल्या अशा या धरतीला बदल्यात काय मिळाले तर निपराध जीवांच्या रक्ताचे शिंपण. म्हणतात ना घर फिरले की घराचे वासेही फिरतात. केंद्र आणि राज्य शासनाच्या 'तू तू मैं मैं'त देशाला वेठीला धरले गेले. प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्यदिनाच्या वेळी उचंबळून येणारे देशप्रेम किती बेगडी आहे हे देशालाही एव्हाना कळून चुकले असेल.

'देश हा देव असे माझा' असे गाण्यातून कितीही आळवले तरी आपल्या देशात व्यक्तिपूजेचे स्तोम जास्त माजवले जाते. जरा कुठच्या क्षेत्रात कुणी कर्तबगारी दाखवली की लगेच त्या क्षेत्रातला तो देवाचा देव म्हणजे महादेव होऊन जातो. या देशातील महत्त्वाच्या व अतिमहत्त्वाच्या व्यक्तिंच्या आगेमागे असणारा सुरक्षा रक्षकांचा ताफा आपण समजू शकतो, पण अलीकडे काही निवडक नशीबवान व्यक्ती सेलिब्रेटीचे बिरुद मिरवत 'पुढे उभा मंगेश, पाठी उभा मंगेश, माझ्याकडे देश माझा पाहतो आहे' अशा थाटात सुरक्षा रक्षकांच्या गराड्यात वावरत असतात. खिरापतीसारखी यांना सुरक्षा तैनात केली जाते. काही स्वतःच्या खर्चाने अंगरक्षक ठेवण्याची ऐपत असणारे देखील या वाहत्या गंगेत हात धुऊन घेतात. अशा व्यक्तिगत सुरक्षेचा खर्च सरकारी तिजोरीतून होत असला तरी ही तिजोरी सामान्य जनतेच्या पैशानीच भरली जाते ना?

खरंच, यांना एवढ्या सुरक्षेची गरज आहे का? देशाची सुरक्षायंत्रणा ढिसाळ असताना यांच्यासाठी एवढा बंदोबस्त का? इतक्या या व्यक्ती देशापेक्षा मोठ्या आणि महत्त्वाच्या आहेत का? मग ज्यांनी हा देश घडवला, देशाच्या स्वातंत्र्यासाठी परकीय सत्तेशी लढा देऊन रक्त सांडले त्यांना कुठे होती ही सुरक्षेची कवचकंडले? ते तर मनाच्या निर्धाराने, निधड्या छातीने रणशिंग फुंकत होते. पेटत्या होमकुंडात आत्माहुती देत होते. आतासारखा 'मेरा भारत महान'चा पुकारा न करता 'सारे जहाँसे अच्छा हिंदोस्तां हमारा' हे साऱ्या जगाला त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले.

थोडक्यात, सुरक्षेचे असे अनाठायी वाटप करताना ज्या देशात आपण राहतो त्या देशाची सुरक्षायंत्रणा किती कमकुवत आहे याची कुणालाच फिकीर नाही. मुंबईत झालेला २६/११चा बाँबस्फोट ह्याचे जितंजागतं उदाहरण आहे. ह्या स्फोटाने किती वास्तू, मने आणि नांदती घरे उध्वस्त झाली. इथे सुरक्षायंत्रणेच्या नाकावर टिच्चून कुठल्या ना कुठल्या मार्गाने दहशतवादी येतात आणि राज्यकर्त्यांना टपली मारून निघून जातात. क्वचीत अफजल गुरू, कसाबसारखे अतिरेकी पकडले गेले तरी हल्लेखोरांनी आपले काम तमाम केलेले असतेच.

काही वर्षांपूर्वी 'प्रमोद नवलकरा'नी आपल्याबरोबर आणलेले पिस्तुल दाखवून लोकसभेत सर्वांची बोलती बंद केली होती. हे पिस्तुल आणि ही आपली सुरक्षायंत्रणा. म्हणजेच 'हा सूर्य आणि हा जयद्रथ' असे म्हणून त्यांनी अक्षरशः सर्वांची भंबेरी उडवली होती.

नुकताच महापालिका आयुक्त सीताराम कुंटेंच्या दालनातदेखील सुरक्षायंत्रणेचा पर्दाफाश चौकीपहारे असलेली सहा दालने ओलांडून पोलिसाच्या वेषात आलेल्या अधिकाऱ्यांनी केला.

आतासुद्धा २६/११ सारखा हल्ला पुन्हा होऊ शकतो असा धोक्याचा इशारा नौदलप्रमुख डी. के. जोशी यांनी नौदलदिनाच्या पार्श्वभूमीवर दिला आहे.

व्यापारी जहाजांना चाच्यापासून संरक्षण देण्याच्या नावाखाली सागरी मार्गाने अनियंत्रितपणे खाजगी शस्त्रागारे तरंगत आणणाऱ्या परदेशी योद्ध्यांचे वाढते प्रमाण ही चिंताजनक बाब असून त्यामुळे देशाच्या सुरक्षिततेला गंभीर धोका आहे. त्यामुळे दहशतवादी घुसखोरी करू शकतात व २६/११च्या मुंबई हल्ल्यासारखा हल्ला त्यामुळे होऊ शकतो. अर्थात देशाच्या सुरक्षिततेसाठी सरकारने या धोक्याच्या इशाऱ्याची गांभीर्याने दखल घेतली तरच देशाचा तरणोपाय आहे.

तसेही, आर्थिक विषमतेमुळे गुन्हेगारी प्रवृत्ती वाढीला लागून सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सराफांच्या दुकानांची लूटमार, दरोडे नित्याचेच झाले आहेत. पण आता हल्लेखोरांनी बँकांच्या एटीएमवर आपले धाडसत्र सुरू केले आहे. सीसीटीव्ही कॅमेरे असूनही बँकांच्या एटीएमसेंटरमधून बिनदिक्कत पैसे काढले जातात. इतकेच नव्हे तर ते काढण्यासाठी नवनवीन युक्त्या-प्रयुक्त्याही योजल्या जातात. मंगळसूत्र, साखळीचोर तर या देशाचे सन्मान्य नागरिक असल्यासारखे उजळमाथ्याने वावरत असतात. बंद घरांवर पाळत ठेवून किंवा एकटीदुकटी माणसे हेरून खून, दरोडे, हत्या करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. काही अपवादात्मक ठिकाणी सोसायटीने ठेवलेल्या सुरक्षारक्षकाच्या मदतीने असे गुन्हे घडल्याची नोंद आहे.

आपल्या घरादारातली, मालमत्तेची आणि स्वतःच्या जीवाची सुरक्षा ही अर्थातच व्यक्तिगत असून ती जबाबदारी ज्याची त्यानी पार पाहायची.

शेजाऱ्याच्या गळ्यात सरी पाहिली की, आपल्या गळ्यात दोरी बांधायाची इच्छा भल्याभल्यांना होते. मग 'गरीबी हटाव'च्या पोकळ वल्गना करणाऱ्या आपल्या देशाने आर्थिक विषमतेपायी विकसित झालेल्या या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा कोण आणि कसा घालणार?

या द्वेषाला, त्वेषाला, लोभाला, मोहाला कारणीभूत असलेला पैसाच सर्व अनर्थाचं मूळ आहे. या पैशाने भल्याभल्याना आपल्या तालावर नाचवले आहे. त्याच्या जाळ्यात सापडून कितीजणांची आयुष्य बरबाद झाली आहेत.

पैशामुळे स्थैर्य मिळाले तरी ते क्षणिक असते. कारण लक्ष्मी मुळातच चंचल असते आणि ती वाममार्गाने मिळाल्यावर तर तिच्या कायम राहण्याची खात्री कशी देता येईल? तरीही यात मुरलेल्या बिलंदरांना याची पर्वा नसते. ते आपले आयुष्य व्यवस्थित जगत असतात, कारण त्यांचे हात वरपर्यंत पोचलेले असतात, असा सुरक्षेचा वरदहस्त मिळण्याची वाट पाहण्यापेक्षा आपणच आपल्या सुरक्षेचा बंदोबस्त करणे ही आता काळाची गरज आहे.

काठीला सोने बांधून काशीयात्रा करण्याचे दिवस ही आता दंतकथा झाली आहे. आता घरीदारी पावलापावलांवर धोक्याच्या घंटा वाजताहेत. सावधानतेचे इशारे दिले जाताहेत. अगदी हसत्या, खेळत्या, बागडत्या कोवळ्या वयाच्या मुलीनाही 'वाटेवरती काचा गं' असे कळकळीने सांगितले जात आहे.

बड्या धेंडासाठी, मर्जीतल्यांसाठी सुरक्षारक्षकांच्या फौजफाट्यावर पैशाची वारेमाप उधळपट्टी करणारे सरकार या बाबतीत पूर्ण उदासीन आहे. कारण की लोकशाही असली तरी हे सरकार सामान्यांचे नाही हे राज्यकर्त्यांनीच वेळोवेळी सिद्ध केले आहे. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अवघे आयुष्य पणाला लावणाऱ्या नरेंद्र दाभोळकरांचे मोकाट फिरणारे मारेकरी हा त्याचा ढळढळीत पुरावा, बोलके उदाहरण आहे.

आणि तसेही जिथे महिला पोलिसांवरही हल्ले होतात, वरिष्ठांकडून त्यांच्यावर अत्याचार केले जातात तिथे त्यांच्याकडून सुरक्षेची अपेक्षा तरी आपण कशाच्या आधारावर करायची? नाहीतरी स्त्रीशक्तीचा साक्षात्कार वेगवेगळ्या रूपातून आपल्याला दिसतोच आहे.

सुरक्षेचे कंकण हाती बांधून परिस्थितीला सामोरे जाण्याचे मनोधैर्य अंगी बाणवणे ही खरोखरच आता काळाची गरज झाली आहे.या राज्याची सुरक्षायंत्रणा सामान्यांसाठी नाही हे कळल्यावर आणि सद्रक्षणाय खलनिग्रणाय अशी शपथ घेतलेली पोलीस यंत्रणाही वेळेवर मिळेलच याची खात्री नसल्यावर आपणच कंबर कसून सरकारच्या सुरक्षायंत्रणेची ऐशीतैशी करण्यावाचून दुसरे काय करू शकतो?

*

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



# युवामंच

प्रवासवर्णन

## TRAVELOG

**✶ Ketki Jayakar ✶**

(मागील अंकावरून)

That night we went to see the Mysore Palace at night. We went to the Palace grounds by six thirty. It was like 26th January celebrations. People from my generation will remember the days when whole of Bombay used to be lit up and people used to go about the streets of Bomabay at night in Trucks seeing the official buildings like V.T. Sachivalya, Stanvac Bulding, G.P.O. etc lit up for the 26th Janauary. The Mysore palace is fitted with 96,000/- light bulbs and at the stroke of 7p.m. with one switch the entire palace is lit up with all the 96,000/- light bulbs shining in all their glory. There were thousands and thousands of people in front of the palace and there was a thunderous applause at 7 o'clock. I too joined in the celebration, enjoying the fairy tale like Palace, clapping my hands expressing my childlike joy. It was so crowded that we thought it prudent not to go inside the palace grounds the entry to which was through a small security check gate.

We had a short time at our disposal since we had taken off during court working days. We had wanted to witness the Dassera festival of Mysore and our Bombay High Court vacations do not coincide with the Dassara festival.We had to cram as much as possible of this wonderful festival.

The next morning was the visit to Jayachandra Art Gallery wherein are displayed the paintings by Raja Ravi Varma. These paintings are our National treasure which require an equally grand background. But unfortunately although the building is majestic, the interior is not grand and is not a proper background for paintings of the Raja Ravi Varma. The paintings are not well maintained. The Mysore Gallery has the largest collection of Raja Ravi Varma's paintingsI personally felt that such beautiful paintings which are worth crores of Rupees should be displayed in the Palace itself. I have seen Ravi Varma's paintings of Laxmi and Saraswati in the Baroda palace which are displayed in the Diwane Khas behind the Maharaja's throne. I do not know the reason for such step motherly treatment where such national treasures are kept in such sad conditions. Haldankar's painting of the Lady with the lamp is very prominently displayed in a niche where the guide switched off the light and we could see the glow. I was very happy to see an artist from Bombay being given so much prominence. There was also the collection of French clocks like the one in the Salar Jung Museum, again very sadly displayed. There were musical instruments, portraits of the Rajas. However the entire ambience was very sad and neglected. Unfortunately one of the paintings had a tear which was square in shape and we could see the wall behind through that tear.

Our visit to the Chamundeshwari Temple was indeed a foolish adventure on our part. During navratri I wished to visit the Temple of the presiding deity of Mysore Chamundeshwari. She vanquished the demon Myshasura hence the city is called Mysuru. I had purchased the so called Golden Pass for a handsome sum of Rs. 7,500/- form Bombay itself and armed with it we were allegedly going to be given VIP entry for all the Musuems, Parks, Zoo, the Jumbo Savazri etc during the Dassara festival. It was issued by the Karnataka Government. Please do not buy such Golden Pass because nobody recognizes it in Mysore. There is a huge communication gap between between the Government agencies and the private organizations which run the Palace and other tourist places. The Chamundi Temple had a crowd of thousands of devoties, it being a Friday and especially it was the day when Myshasura was killed. We barely got to enter the Temple by pleading with an Inspector who knew English and had vaguely heard about the Golden Pass. He allowed us to go in by the no entry, but from there we were on our own, you have to walk the path to the deity on your own merits, anyway, discretion is the better part of valour, I handed over the offering to a fellow devotee and we returned to our hotel. However the way to and back from from the Temple on the hill was very beautifully and tastefully lit up with colourful lights hanging from the huge trees which were majestically lining up the road.

**Sunday**

Early morning on Sunday we left for Belur and Halebid which is about three hours drive from Mysore. The roads in Karnata are beautiful and we sped along the road lined on both sides with green rice fields as well as sugarcane farms. There were small villages on the road, where villagers were selling marigold malas and there were mounds of green pumpkins (Kohale) which we use in weddings or at big havans. The pumpkin seems to be a very important part of Mysore's rituals. Every household had a pumpkin in front of their threshold, cut across and sprinkled with red kumkum. It symbolizes the sacrificial animal which is cut to appease the Gods. Whilst we were driving we suddenly had to hault at a level crossing which was closed. The road was passing through green fields and it was cloudy and a cool breeze was blowing. I got out of the car to stretch my legs. I was looking at the gate of the level crossing when I saw a man come out of the Railway cabin with a huge green pumpkin in his hands and stand between the rails. Another man followed him with two lemons (Limbu) and tied each lemon to the two rails. A third one came out with a coconut and they were all waiting, I saw at the other side and saw the train approaching slowly. The Railway man was waivng the red flag, the huge engine decorated with banana leaves and marigold flowers, slowly came towards the level crossing and braked at the level crossing. The men broke the pumpkin in front of the engine, the coconut too was broken, they gave Prasad of the coconut to the engine driver, they did Arti to the engine and then gradually the engine moved on the rails crushing the lemons under its grinding wheels. I found this scene very enduring because there was so much genuineness in it, no bollywood nonsense, no fanfare, simply the age old rituals being solemnly observed with great sincerity. I wish the People in Bombay would stick to our age old traditions and celebrate our festivals with such fervor and devotion instead of rushing to the Paladium for a day spend!

Once the level crossing opened we went straight to Belur Temple built in the 11th Century by the Hoysala ruler Vishnu Vardhan. It is a beautifully built temple dedicated to Channa Keshava i.e Vishnu, built on a star shaped platform. Belur is to be seen from within and Halebid to be seen from the outside (as explained by the Guide). The architecture is very similar to the Khajuraho temples. But it is more compact, being one main temple being flanked by the temples of Bhudevi and Shreedevi. The Channa Keshava meaning the handsome Keshav is indeed very handsome, carved out of black soft stone and sporting sparkling diamond jewellery. The regular features of the Indian temples are the Gabhara, the Antrala and the Sabha Mandap. Even in ancient days where the mode of communication was so rare yet we have uniform system of architecture. There was a huge Garuda in the Temple complex as well as a small replica of the main temple. Just as we lawyers have drafts of the Petitions, in olden days they too had drafts of the main temple. At the side there was a smaller version of the main temple. The guide told us that it was a rough image of the main temple. I am reminded of the Shiv Temple of Raja Bhoj near Bhopal which was built in the 10th Century which too had drafts of the temple etched on the stones. It is amazing to see that inspite of such limited facilities our ancient temples were built to such perfection. A special feature of the Belur temple was a circular dance floor, slightly raised, to enable the temple dancers to dance in front of the deity. This feature is not there in the Khajuraho temple. The Hoysala Queen ShantalaDevi was a keen dancer and encouraged temple dancing. There are several wall mounts of dancing women, beautifully carved out of stone. I run out of words to describe the exquisite carvings and the passion behind it. It took 20,000 thousand craftsmen to complete these temples.

The next temple was the Halebid Temple which is dedicated to Hoysaleshwara and Shantaleshwara both being forms of Shiv. The outside walls contain beautiful carvings from Mahabharat and our Indian mythology. For the first time I saw a dancing Saraswati, the Airawat of Indra. The guide told us that Airawat, the elephant of Indra had double tusks. There was stunning statue of a Dharmapal wearing a gown and wig and holding a dharmadanda. Of course my solicitor from Bombay who is so enamoured with the wigs and gowns of the British Barristers was stumped to find that the wig and the gown is an Indian design made as far back as the 11th Century!

A common statue to be found in Khajuraho and Halebid was the Vishkanya, a statue of a beautifully bejewelled voluptuous woman, well coiffered, with a scorpion upon her exposed thigh. The guide told us that it was part of Chanakya niti whereby the girl was conditioned to the scorpion's poison and then sent to seduce the enemy whereby the enemy would get infected by the poison and die. I was quite disturbed to hear this, that even in the olden days women were used as tools to win wars.

(क्रमशः)

✳

लेखांक १२

# मनातलं

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

बघता बघता २०१३चा डिसेंबर महिना आला. वर्षाचा निरोप घेणारा हा महिना. माझ्या लेखमालेच्या समारोपाचा हा लेखांक. आत्ता आत्ता तर मी जानेवारीचा लेख लिहून हातावेगळा केला होता. तुमच्याशी गप्पा मारता मारता वर्ष कधी संपले तेच कळले नाही. ज्याला आरंभ आहे त्याला अंतही आहे आणि ते अपरिहार्य आहे. अनादि अनंत फक्त काळ आहे. तो स्वत: तर खूप जोरात पळतोच, पण आपल्यालाही त्याच्याबरोबर पळवतो. सुरुवातीला आपणही खूप जोरात पळतो, पण पळता पळता कधी कधी दमछाक होते,तेव्हाही क्वचित प्रसंगांनी उत्साहाची थंडगार झुळूक येते. मनात उगीचच श्रावण फुलतो. मनमयूर पिसारा उभारून नाचूही लागतो.

वर्षाच्या सुरुवातीला उत्साह असतोच.त्या उत्साहातच गुढी पाडव्यापासून सुरू होणारा वसंतऋतु मन आल्हाददायक करतो. ऋतूंच्या उत्साही वातावणाचा पगडा पुरता न ओसरल्याने ग्रीष्माची रखरखही विशेष जाणवत नाही. बालकवींच्या कवितेतला श्रावण तर समोर साकार होऊन कवितेचं अंतरंग दरवर्षी नव्यानं खुलवतो. शरदऋतु दसराबलिप्रतिपदा हे दोन जबरदस्त महत्त्वाचे सण आणणारा. त्यातच होणाऱ्या तुलसीविवाहामुळे वातावरणाचे मंगल पवित्र रूप दाखविणारा. डिसेंबरपर्यंतच्या ऋतुमधील हेमंत ऋतु इंग्रजी वर्षाला निरोप देणारा. शिशीर पुन्हा येणाऱ्या नवीन वर्षाच्या उत्साहात थंडी सुखद करणारा.

मी मात्र या वर्षभरात प्रभुतरुणाकडे मनातलं गूज मोकळं करताना उत्साह, उत्साह आणि फक्त उत्साहच अनुभवला. वर्ष कधी संपत आलं ते कळलंच नाही. वर्षभर एवढ्या गप्पा मारल्या तरीही खूप काही सांगायचं राहूनच गेलं. कारण गप्पांचे विषय अगणित. त्यातही प्रत्येक विषयाच्या बाजू अनेक आणि प्रत्येक बाजूचे कंगोरे असंख्य. ते दाखविण्यासाठी प्रत्येक दृष्टिकोनावर स्वतंत्र लेखांक होऊ शकतात एवढी त्या विषयाची व्याप्ती आहे.. वर्षाच्या आरंभी खूप उत्साह, खूप योजना असतात. शेवटी बघावं तर त्यातील थोड्याच योजना पार पडलेल्या दिसतात. तेच लेखनाचं. लेखमालेची सुरुवात करताना खूप लिहायचं मनात होतं. खूप लिहिलंसुद्धा. पण काही विषयांना स्पर्शसुद्धा करायला मिळाला नाही.

आयुष्याचंही असंच असतं नाही? पुष्कळांना आयुष्याच्या सायंकाळी लक्षात येतं की, करायचं काही वेगळंच होतं. पण घडलं काही वेगळंच. खरंतर हा सगळा नियतीचा खेळ असतो. म्हणजे पुन्हा तेच तत्त्व-दैववाद अन् प्रयत्नवादाच्या जोडीचं. लक्षात येतं की खूप काही करायचं राहूनच गेलं. अर्थात आपण केलेल्या पुष्कळ कामांचं समाधान असतं नी जी कामं फसली त्याबद्दल रुखरुख. कधीकधी स्वत:हून निवडलेलं कार्यक्षेत्र चुकतं नी आईवडिलांचा सल्ला मानला असता तर बरं झालं असतं असंही काही लोकांना वाटतं. पण एकदा का या सर्व लोकांनी दैववादाची संकल्पना लक्षात आणली की ती बोच हळूहळू कमी होते. तरीही त्या सर्वांनाच वाटत राहतंच की आपलीच प्रयत्नांची दिशा चुकली किंवा तत्कालीन परिस्थितीनुसार नाही करू शकलो. म्हणजे पुन्हा तेच-अपयशाची कारणे शोधणं.

यातूनच मग अंधश्रद्धेचा हात धरला जातो. अशीच एक वेगळी अंधश्रद्धा मागच्या तपात पुष्कळांनी अनुभवली. ती काहीनी फक्त दुरून बघितली. १ जानेवारी २००१ पासून सुरू झालेली अत्युत्तम तारखेची सुवर्णसंधी गेल्या वर्षी १२ डिसेंबर २०१२ला संपली. आता पुढच्या शतकापर्यंत वाट बघणं आलं. काहींच्या बाबतीत ते शक्यच नाही. कुणी अशाच एका तारखेला विवाहबद्ध होणं पसंत केलं. तेसुद्धा त्या तारखेच्या तासा-मिनिटा-सेकंदापर्यंतचा मुहूर्त धरून. काहींनी अशाच एखाद्या मुहूर्ताला बाळाचा जन्म आयोजित केला. काहींनी आयुष्यातील दुसरी काही महत्त्वाची कामं तेव्हा पार पाडली. किती मोठी अंधश्रद्धा आहे ही! जन्ममरण फक्त देवाच्या हाती आहे. डॉ. पुरंदरेंच्या 'शल्य-कौशल्य' या आत्मचरित्रा-तला एक प्रसंग आठवतो. एका बाईची प्रसूती सिझेरियननं करायचं ठरलं होतं. डॉ. पुरंदरेंचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यास होता व त्यावर विश्वाससुद्धा होता. त्यामुळे त्यांनी जी वेळ ठरली होती त्याप्रमाणे होणाऱ्या बाळाची कुंडली मांडली. त्याप्रमाणे त्या बाळाचं आयुष्य अतिशय वाईट जाणार असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी ताबडतोब चांगली वेळ शोधून काढली आणि त्यानुसार वेळेच्या आधी दोन अडीच तास त्या बाईची प्रसूती घडविली. हा वादाचा मुद्दा आहे की, खरंच त्यानुसार त्या बाळाचं आयुष्य चांगलं गेलं का? गेलं असल्यास हे त्या 'बाळाचं' सुदैव की डॉक्टरांना वेळेत कुंडली मांडणं सुचलं की त्या 'बाईचं' नशीब की तिच्या नशिबात मूल आणि त्या मुलाचं चांगलं झालेलं बघणं होतं?आणखीन एक गोष्ट प्रसूतीच्या वेळी लक्षात आली ती अशी की तिच्या प्रसूतीत काही तांत्रिक अडथळे निर्माण झाले होते ज्यामुळे पूर्वनियोजित वेळेपर्यंत डॉक्टर थांबले असते तर ती बाई नी ते बाळ ह्यांच्यापैकी एक किंवा कदाचित् दोघांच्याही प्रकृतीला ते खूप हानीकारक ठरलं असते. पण तसं घडणं ही नियती नव्हती. म्हणजेच माणसानं काहीही ठरवलं तरी त्याला दैवाची जबरदस्त साथ हवीच. असं जर आहे तर वर उल्लेखिलेल्या जादुई तारखांना नी त्या वेळेला जन्माला घातले गेलेल्यांचे आयुष्य खूप छान ठरले का हे नंतर कुणीच तपासून पाहिलेले नाही. १२-१२-१२चं चित्र अजून अस्पष्ट आहे. पण १-१-१ची माहितीही कुणी जाहीर केलेली नाही. या तारखांना नी त्या मिनिटाला, त्या सेकंदाला लग्न केले त्यांच्या कथा कुणाला माहीत आहेत का? या सगळ्यांच्या नशिबात चांगलं असेल तर त्यांचं सगळं चांगलं चाललंच असेल. या सगळ्या तारखा, तास, मिनिटे, सेकंद सगळ्यात जास्त फळले असतील तर ते लग्न लावणाऱ्या भटजीना, लग्नाच्या हॉलच्या मालकांना, कॅटररसना, प्रसूती घडवून आणणाऱ्या डॉक्टरांना नी त्या हॉस्पिटल्सना- अर्थात हे सगळे म्हणणारच की त्यांना त्या तारखा खूप फायदेशीर ठरल्या. तसा फायदा होणं हे त्यांच्या नशिबात असणारच ना? कुणाची नशीब फिरविण्याची ताकद या तारखांमध्ये आहे का?

हल्लीच्या तुफान स्पर्धेच्या काळात सगळ्यांची मनं अस्थिर झाली आहेत. त्यामुळे कुणीतरी अशी काहीतरी टूम काढतात नी सगळी जनता डोळे मिटून नी मेंदूला विचार थांबवण्याची आज्ञा देऊन अशा गोष्टींच्या मागे धावतात. याच कारणांमुळे हल्लीची तरुण पिढी जास्त अंधश्रद्धाळू बनत चालली आहे. खरं तर या पिढीकडे खूपच कुशाग्रबुद्धी आहे. पण प्रत्येक क्षेत्रातली स्पर्धा खूप वाढलीय नी ते तणाव या पिढीला झेपणं शक्य नाही. परिणामी त्यांची कुशाग्रबुद्धी या अंधश्रद्धांनी वेढली जाऊन तत्त्वहीन, विचारहीन बनलीय. आत्ताच असं; तर त्यांच्या आयुष्याच्या संध्याकाळी त्यांना आठवण्यासारखं समाधान-कारक काहीच नसेल.

आपल्याला कधी कधी अनपेक्षित लाभ होतात. ते आठवून खूप समाधान लाभतं. वर्षाच्या शेवटी किंवा आयुष्याच्या कातरवेळी किंवा कोणतीही चांगली गोष्ट संपत येते तेव्हा हेच आठवावं की काय काय मिळालं. जे मिळालं नाही त्याची पुन्हा सुरुवात किंवा प्रयत्न करता येतात का ते बघावं नी पुढच्या वर्षी ते मिळवण्याचा प्रयत्न करावा. ते शक्य नसेल तर दुसरं काही करता येतं का ते बघावं नी तेसुद्धा शक्य नसेल तर दुसरं फक्त आणि फक्त यश आठवावं, समाधान आठवावं, आनंद आठवावा. नाहीतर जी कामं जमली नाहीत तीच आपल्याभोवती फेर धरून नाचत राहतात.

कोणत्याही गोष्टीला अंत असतोच. फक्त वाईटाचा अंत आनंद देणारा तर चांगल्याचा अंत मन उदास करणारा असतो. तशी ही लेखमालासुद्धा या लेखाबरोबर संपतेय्. बघूया पुन्हा केव्हा तुमच्याशी गप्पा मारायला मिळतात ते. तोपर्यंत स्फुट लेख नि कविता आणि कादंबऱ्यांमधून मी तुम्हाला भेटेनच.

गप्पा आवरत्या घेण्याआधी आभार मानायचे आहेत ते मुख्यत: सुहासिनीताईंचे नी प्रभुतरुणाचे. त्यांच्यामुळे प्रभुतरुणाचं हे व्यापक व्यासपीठ मला गप्पा मारण्यासाठी मिळालं व मला खूप खूप गप्पा मारता आल्या.आता तुमचे-वाचकांचे मनापासून आभार. वर्षभर माझ्या गप्पा सहन केल्याबद्दल. काही वर्षांपूर्वी कुणीतरी माझ्याबद्दल म्हणालं होतं- 'ही लिहिण्यात बहाद्दूर आहे. लिही लिही लिहिते' मैत्रिणी म्हणतात, 'बोल बोल बोलते.' हे सगळं खरंय. मन मोकळं करण्याची हीच तर दोन प्रमुख साधनं आहेत. मोकळं मन, रिकामं नव्हे; तर मोकळं मन हे आनंदाचे माहेरघर असतं, जिथं आनंदाला मनमोकळा ताजा श्वास घेता येतो. तिथे सगळ्याच विचारांना एक उत्तम उंची गाठता येते, संजीवनी मिळते.

तुम्ही ठरवलं होतं ते सगळं केलं की नाही? लिहायचा प्रयत्न सुरू करा. त्यासाठी वाचन करा. वाचनासारखा दुसरा सच्चा सुहृद नाही. पुस्तकांमुळे दुसऱ्यांचे अनुभव पुस्तकातूनच अनुभवता येतात, संकटांवरचे उपाय जे वागण्याबोलण्यातून घडवायचे असतात ते- अर्थातच मनाचे व्यापार- कळतात. नव्या वर्षात लिहायला सुरुवात करा. तुमचं साहित्याच्या प्रांगणात स्वागत करायला मला खूप आवडेल. अरे हो! एक सांगायचं राहिलंच- आयुष्यात मला आणखी बरंच काही शिकायचंय. थोर साहित्यिकांच्या लेखनातून बरंच शिकण्यासारखं असतं. दुसऱ्यांकडून, अगदी पुढच्या नवीन पिढ्यांकडूनही खूप काही शिकायचंय- जिज्ञासूवृत्ती नी ज्ञानपिपासा हवीच- नाही का?ही वृत्तीच आपल्याला समृद्ध करते.

चला- आता गप्पांमध्ये थोडी विश्रांती घेते. पुन्हा भेटूच. तोपर्यंत आत्तापुरता नमस्कार.

❋

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणास देणगी

✳ श्रीमती लता पुष्पसेन राणेंकडून त्यांचे पती कै. पुष्पसेन विनायक राणे यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने रु. १,००१/-

✳ सौ. सुप्रिया आणि श्री. उमेश कीर्तिकर यांजकडून दिवाळीच्या शुभेच्छांसह रु. ५०१/-

✳ श्री. आनंद धुंडिराज कोठारे आणि कुटुंबीयांकडून श्री. आनंद यांचे वडील कै. डॉ. धुंडिराज मोरेश्वर कोठारे (डी.एम्.) यांच्या २५व्या स्मृतिदिनानिमित्त
(निधन:२९-१२-१९८८) रु. २५०/-

✳ सौ. यशाली राहुल आगासकर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ३५०/-

✳ कु. यशश्री दीपक नवलकर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ३५०/-

✳ श्रीमती लेखा अविनाश कोठारे यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ३५०/-

✳ श्री. सुभाष वामनराव विजयकर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ३५०/-

✳ **प्रभुतरुणासाठी भाऊबीज**

| | |
|---|---|
| श्री. मुकुंद सदाशिव गोरक्षकर | रु. १५००/- |
| सौ. रीटा मंदार नायक | रु. ५००/- |
| सौ. ज्योत्स्ना रंजन धैर्यवान | रु. १०१/- |
| सौ. जना रवींद्र नवलकर | रु. १०१/- |
| सौ. स्मिता अमोल रणजित | रु. १०१/- |
| सौ. वृंदा शाम जयकर | रु. १०१/- |
| श्रीमती सरोजिनी रामनाथ नवलकर | रु. १०१/- |
| सौ. सुरुची अनिल प्रधान | रु. १०१/- |
| सौ. जयश्री सचिन जयकर | रु. १००/- |
| सौ. मीनल हेमंत जयकर | रु. १००/- |
| सौ. निकेता प्रशांत राणे | रु. १००/- |
| सौ. नीना महेश राव | रु. १००/- |

✳ **गतांकी भाऊबीज सदरातील मजकूर कृपया असा वाचावा**

| | |
|---|---|
| श्रीमती सुहासिनी सुहास कोठारे | रु. २५१/- |
| सौ. शोभा रंजन विजयकर | रु. २०१/- |
| सौ. जयश्री राजशेखर राणे | रु. २०१/- |
| सौ. आशा जयबाल विजयकर | रु. १५१/- |
| सौ. उर्मिला विजय धैर्यवान | रु. १२५/- |

## जीवेत् शरदः शतम्!

✳ १६-११-१३ रोजी प्रभादेवी येथील कोहिनूर सभागृहात मृदुला प्रभुराम जोशी यांचा सत्तरावा वाढदिवस साजरा झाला. त्यांच्या कार्यपरिघातील त्यांचे सुहृद, मोजके नातेवाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याचे आयोजन त्यांची कन्या अनुपमा हिने केले होते. मृदुलाची अत्यंत चपखल ओळख अनुपमाने करून दिली. लता मंगेशकर, गुलजार आदींबरोबरच्या मृदुलाच्या छायाचित्रांनी हा वाढदिवस रेखला गेला. कुणाचीही भाषणे न होता झालेल्या या सोहळ्यात रंगत आणली ती गाण्याने. मृदुला यांचा कॅनडात 'इंडियन आयडॉल' ठरलेला सुपुत्र श्री. अतुलने 'पंथी' म्हटले; अन् मग अनुपमाचे कबीर दोहे, स्वत: मृदुलांनी म्हटलेली काही गीते यांनी कार्यक्रम सुरेल झाला. श्री. रामदास भटकळांनीही 'आनंदी आनंद गडे' स्वत: लावलेल्या चालीवर म्हटले अन् 'जिकडे तिकडे चोहिकडे' आनंद भरून राहिला. मृदुलाच्या कार्याचा जोम अधिकच वाढता राहो. शुभेच्छा.

✳ आमचे विश्वस्त श्री. विनोद प्रधान यांनी २९-११-१३ रोजी ऐंशी वर्षे पूर्ण केली. त्यांचे मार्गदर्शन, त्यांचा उत्साह प्रभुतरुणाला पुढे वाटचाल करण्याला बळ देतो. 'ऐंशी? वयाची ऐंशी? अशी कशी?' असे वाटायला लावणारी त्यांची कामाची शिस्त आहे. म्हणून त्यांची ऐंशी- खाशीच म्हणायला हवी. शुभेच्छा.

✳ दिनांक १-१२-१३ रोजी वांद्र्याच्या 'सिलेब्रेशन' मध्ये श्री. उमेश कोठारे यांची 'ऐंशी' बहारदार साजरी झाली. श्री. विनय मांडके, चिंतामणी सोहनी, पल्लवी केळकर आदी गायकांनी जुनीनवी गाणी सादर केली. सौ. कल्पना कोठारे, श्री. सीमित देसाई यांनीही आपला सूर त्यात मिसळून गाणी म्हटली. सौ. सुरुची प्रधान यांनी 'घन निळा लडिवाळा' म्हणून उपस्थितांचे कान तृप्त केले. श्री. उमेश आणि सौ. उर्मिला यांचे भावजीवन त्यांनी भेट दिलेल्या निरांजनासारखेच अखंड तेवत राहो. या प्रसंगानिमित्त सौ. कल्पना कोठारेंनी केलेली कविता देत आहे.

वाट चालता चालता न थकता, भागता
कसे सरले दिवस चालू राहो हीच साथ
पान ऐंशी तोरणा अजून उभा चढायाचा
आले फलिताचे घोस शालू हिरवासा पथ

अशी वळणे घेताघेता गान संपता, संपता
उभी दृष्ये मनोहारी येते जशी भैरवी
स्मृतिघाट उतरता नाम विठूचे आठविता
वटछाया दाटे उरी वाढो जीवन गोडवी

**-कल्पना सुभाष कोठारे**

✳ श्री. प्रफुल्ल कोठारे यांची ८ डिसेंबरला सत्तरी साजरी झाली, त्या निमित्ताने त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केलेल्या भावना येथे देत आहोत.

He is a man of honour, honesty, smiles, laughter, seriousness, hard worker and a complete family man. A simple family man. A simple man of great values and power packed thoughts. Extreme high willpower, strong and determined... The words fall short. He is a man of a few choice words as most of us know. The wrinkles on his skin are hiding layers of wisdom and knowledge. The grey hair show the depth of his experience. A man who loves his family and his friends. Its admirable to see what he has achieved in life so far... Years have passed and on 8th December 2013, he completes his 70th birthday... Oh ya... he is now the `Septuagenarian'... This is none other than Mr. Prafulla Medhavrao Kothare.

We all wish you a very Happy Birthday and best wishes for healthy future.

-All family members

# प्रभुतरुणाची डायरी

## आत्याबाई नाव बोला

२३-११-१३ अश्वथ (आदित) अमेय कीर्तिकर खार

## नांदा सौख्यभरे

२३-११-१३ कु. संयुक्ता संजय पद्माकर कीर्तिकर, श्री. गणेश दिनकर चौधरी (आं. ज्ञातीय)
०७-१२०१३ श्री. रौनक समीर बाळकृष्ण विजयकर, कु. सुप्रीत तीरथ सिंग सप्रा (आं. ज्ञातीय)
०८-१२-१३ श्री. रौनक श्रीलेश त्रिलोकेकर, कु. अर्पिता नीलेश कोठारे
१२-१२-१३ श्री. राजस उल्हास मोरेश्वर राणे, कु. कविता हरीश रामचंद्र वाझकर

## मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १९-११-१३ | डॉ. प्रमोद त्रिलोकेकर | वय ७९, | खार |
| १४-११-१३ | श्री. विश्वनाथ बाळाराम विजयकर | वय ८४ | पुणे |
| २४-११-१३ | श्री. नवीनचंद्र (विठू) माधवराव कोठारे | | ठाकुरद्वार |
| २६-११-१३ | श्री. राजन मनोहर व्यवहारकर | वय ६० | वांद्रे |

*गतांकी मरण सदरात मीरा शांताराम मानकर वय ७३ असे कृपया वाचावे*

| | | | |
|---|---|---|---|
| ३०-११-१३ | श्री. शंकर गजानन वेलकर | वय ९८ | महालक्ष्मी |
| २९-११-१३ | श्रीमती अलका गोरक्षकर | | |

## अभिनंदन

✳ कु. आशना अभिजित तळपदे या आठ वर्षाच्या चिमुरडीने 'ब्रेनवेव्हज् २०१३' अंतर्गत आंतरशालेय मराठी कथाकथनात दुसरा क्रमांक पटकावला. अभिनंदन.

✳ 'तेंडुलकर आऊट' हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. त्याचे दिग्दर्शक आहेत श्री. स्वप्ननील जयकर. चित्रवाणीवरील अनेक कार्यक्रमात या चित्रपटाच्या मोहिमेअंतर्गत श्री. स्वप्ननील या चित्रपटातील वेगळेपण सांगत आहेत. त्यांना शुभेच्छा.

✳ 'कवितांगणातील कविता' या संपादित पुस्तकात श्री. मनोज धुरंधर यांची कविता समाविष्ट आहे. या पुस्तकाला प्रस्तावना सुहासिनी कीर्तिकर यांची आहे. ३ डिसेंबर रोजी ठाणे ग्रंथ संग्रहालयतर्फे झालेल्या फ. मु. शिंदे यांच्या सत्कारात त्या एक प्रमुख वक्त्या होत्या.

✳ सॉलिसीटर आणि ॲड. श्री. राजन मोतीराम जयकर यांच्या संग्रहातील काही निवडक पोस्टकार्ड चित्रांचे प्रदर्शन फोर्ट येथील डेव्हिड ससून ग्रंथालयात आयोजित केले गेले. या चित्रांतून मुंबईचा इतिहास उलगडला गेला. श्री. राजन यांच्या संग्रहात मुंबईची पाच हजारांहून अधिक पोस्टकार्डस् आहेत. या प्रदर्शनात जुन्या मुंबईतील रस्ते, धोबीतलाव, बोरीबंदर, ओव्हल मैदान आदी ठिकाणे, मुंबईतील पूर्वीचे व्यावसायिक- नागरिक, चित्रकार एम्. व्ही. धुरंधर यांनी रेखाटलेली व्यवसाय करणाऱ्यांची चित्रे मांडली होती. त्या काळातील ब्राह्मण, पारशी, परभू, कोळी यांची चित्रेही लक्षवेधक होती. श्री. राजन यांच्या या ऐतिहासिक कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

## आवाहन

प्रभुतरुणाचे आजीव सदस्य असलेल्या अनेक सभासदांचे कालपरत्वे निधन झाल्यावरही त्यांच्या कुटुंबीयांच्या पत्त्यावर सद्भावनेने अंक पाठविला जातो. तहहयात सदस्यत्व म्हणजे त्यांच्या हयातीपर्यंतच अंक पाठविणे योग्य. प्रभुतरुणाची सद्भावना लक्षात घेऊन मृत झालेल्या सदस्यांच्या कुटुंबीयांना विनंती की, त्यांनी नव्याने सदस्य होऊन प्रभुतरुणावरील लोभ वृद्धींगत करावा.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67